पुढारी | गुरुवार
२८ जानेवारी २०१६

# जातीभेदविरहित समाज निर्मितीसाठी कटिबद्ध व्हावे : डॉ. कोमरपंत

दोडामार्ग : वार्ताहर

युवक व युवती हे राष्ट्राचे आधारस्तंभ आहेत. त्यांच्या बाहुत अमर्याद शक्ती असते, ते समाज बदलू शकतात. प्रतिकुलतेचे अभेद्य फोडण्यासाठी ही अमर्याद ऊर्जा त्यांच्या अंगी असते. तरूणांचे कोणतेही स्वप्न नसते तर भव्यतेचा आणि दिव्यतेचा त्याला स्पर्श असतो. आपली स्वप्ने त्यांनी राष्ट्र निर्मितीच्या स्वप्नात गुंफली तर एक दैदीप्यमान राष्ट्र घडेल. मात्र युवकांनी आपल्या अवती-भवतीच्या परिस्थितीचे अवलोकन करावे. संस्कृतीतील शांती, सत्य, अहिंसा, समता, स्वातंत्र्य आदी मूल्ये आत्मसात करावी. प्रत्येक युवकाने जातीभेदविरहित नवसमाज निर्मितीसाठी कटिबद्ध व्हावे, असे विचार गोवा विद्यापीठाचे माजी मराठी



दोडामार्ग : विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना डॉ. सोमनाथ कोमरपंत.

विभागप्रमुख व ज्येष्ठ साहित्यिक डॉ. सोमनाथ कोमरपंत यांनी मांडले.

ते येथील लक्ष्मीबाई सीताराम हळबे महाविद्यालयाच्या वार्षिक स्नेहसंमेलन व पारितोषिक वितरण समारंभात प्रमुख अतिथी म्हणून बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विवेकानंद नाईक होते. ते पुढे म्हणाले, राष्ट्रीय नवनिर्माणामध्ये विज्ञान दृष्टी, आत्मिक बळ, भौतिक परिवर्तन, सामाजिक समता, शिक्षण, समाजसुधारकांची स्मृती आदी बाबी तरूणांनी अंगी बाळगल्या पाहिजेत. खेड्यापाड्यापर्यंत विचार पोहोचविण्याचे आवाहनही त्यांनी केले.

नवनिर्माण शिक्षण संस्थचे सदस्य भाई परमेकर, प्राचार्य डॉ. व्ही. ए. पाटील, विवेकानंद नाईक, नगरसेविका सौ. रेश्मा कोरगावकर आदी उपस्थित होते. दीपप्रज्वलनानंतर कार्यक्रमाची सुरुवात झाली. शैक्षणिक वर्ष २०१५-१६ मध्ये घेण्यात आलेल्या विविध स्पर्धांमध्ये यश संपादन केलेल्या विद्यार्थ्यांचा मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. सामाजिक बांधिलकीच्या भावनेतून यावर्षी प्रथमच दोडामार्ग नगरपंचायत निवडणुकीत निवडून आलेल्या नगरसेवकांचा सत्कार डॉ. व्ही. ए. पाटील यांच्या हस्ते करण्यात आला. कॉलेजक्वीन सायली गवस, कॉलेजकिंग राजेश नाईक तर आदर्श विद्यार्थी म्हणून प्रीती गवस यांना सन्मानित करण्यात आले. प्रास्ताविक डॉ. व्ही. ए. पाटील यांनी केले. अहवालवाचन सांस्कृतिक विभागप्रमुख प्रा. दिलीप बर्वे, सूत्रसंचालन डॉ. पी. डी. गाथाडे तर आभार डॉ. एस. यु. दरेकर यांनी मानले. सायंकाळी 'अंतर्नाद' या सांस्कृतिक कार्यक्रमाला सुरुवात झाली. या स्नेहसंमेलनात विद्यार्थ्यांनी विविध कलागुण सादर करून प्रेक्षकांची वाहव्वा मिळविली.

29/1/2016